गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## महात्मा गांधीवर आधारित अखिल गोवा प्रश्न मंजुषा

## स्पर्धेचे माहिती खात्यातर्फे आयोजन

ता. 05 ऑगस्ट 2019

14 श्रावण 1941

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती वर्ष निमित्ताने माहिती खात्याने 26 ऑगस्ट रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर आधारित पदवी महाविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन केले आहे. महात्मा गांधीममममोहनदास ते महात्मापर्यंतचा प्रवासफ्फअसा स्पर्धेचा विषय आहे. 26 ऑगस्ट रोजी दुपारी 2 ते संध्या 6 वाजेपर्यंत पणजीतील मिनेझीस ब्रागांझा संस्थेच्या मुख्य सभागृहात ही स्पर्धा घेण्यात येईल.

सरकारतर्फे 2 ऑक्टोबर 2018 ते 2 ऑक्टोबर 2020 पर्यंत साजरा करण्यात येणाऱ्या महात्मा गांधी यांच्या 150 वी जयंती कार्यक्रमाचा हा एक भाग आहे.

प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा एकूण दोन टप्प्यात ही स्पर्धा घेण्यात येईल. प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा एक गट असेल. महाविद्यालयातर्फे दोन गट पाठविता येतो. प्रथम उत्कृष्ठ पाच गट अंतिम फेरीत भाग घेतील.

स्पर्धेतील विजेत्याना रोख 10 हजार रूपयांचे प्रथम, 6 हजार रूपयांचे द्वि तीय आणि 5 हजार रूपयांचे तिसरे बक्षिस देण्यात येईल. याशिवाय चषक देण्यात येईल तसेच दोन उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जातील.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी संचालक, माहिती आणि प्रसिध्दी खाते तिसरा मजला उद्योग भवन, पणजी यांच्याकडे 24 ऑगस्टपूर्वी आपले अर्ज सादर करावे.

अधिक माहितीसाठी 9860898001 किंवा 9923269878 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/436

--

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,

NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA